## प्रेसनोट

दि. ०४/०९/२०२४

**वडगांवमावळ पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथील सहायक पोलीस उपनिरीक्षक व पोलीस अंमलदार यांचेवर लाच मागणी व स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | वडगांव मावळ पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ५१ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) सुनील तुळशीदास मगर, वय ५५ वर्ष,पद-सहायक पोलीस उपनिरीक्षक (वर्ग-३)<br>२) सागर कैलास गाडेकर, वय ३४ वर्ष, पद - पोलीस अंमलदार, (वर्ग-३)<br>दोघे नेमणुक - वडगांव मावळ पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | ३५,०००/- (पस्तीस हजार रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३५,०००/- (पस्तीस हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. ०४/०९/२०२४ रोजी |
| सापळा दिनांक | दि. ०४/०९/२०२४ |
| ठिकाण | दिनांक ०४/०९/२०२४ रोजी ११.०० वा चे सुमारास नवीन इमारत वडगांव मावळ पोलीस स्टेशन, जि.पुणे. |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे विरुद्ध वडगांव मावळ पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे फौजदारी पात्र गुन्हा दाखल असून, सदरचा गुन्हा लोकसेवक क्र. १ सुनिल मगर यांचेकडे तपासासाठी आहे. नमुद गुन्ह्याचे तपासात योग्य ती मदत करण्यासाठी लोकसेवक क्र. १ सुनिल मगर व लोकसेवक क्र. २ सागर गाडेकर यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/- रुपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक क्र. १ सुनिल मगर व लोकसेवक क्र. २ सागर गाडेकर यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्याविरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्यात मदत करण्यासाठी ५०,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, पंचासमक्ष तडजोडीअंती ३५,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, लोकसेवक क्र. १ सुनिल मगर व लोकसेवक क्र. २ सागर गाडेकर यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये ३५,०००/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारले असता त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध वडगांव मावळ पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

४/९/२४

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner